# Mukt Shabd

## UGC CARE JOURNAL

ISSN NO : 2347-3150

MUKt SHABd JOURNAL

ज्ञान-विज्ञान विमुक्तये
UGC
University Grants Commission
Approved Journal List

Impact Factor : 4.6

A Peer Reviewed/ Referred Journal

Edited By
MSJ : Mukt Shabd Journal
http://shabdbooks.com/

Copyrights @ 2020 MSJ: All Rights reseved.

# MSJ
## Mukt Shabd Journal

## Volume IX, Issue V,
## MAY 2020

**Edited By**
**MSJ- Mukt Shabd Journal**

http://shabdbooks.com/

**Editor in Chief: Sumit Ganguly**

**MSJ - Mukt Shabd Journal**

Book: 2020: Volume IX, Issue V, MAY - 2020
ISSN (Print): 2347-3150

This work is subjected to copyright. All rights are reserved whether the whole or part of the material is concerned, specifically the rights of translation, reprinting, re-use of illusions, recitation, broadcasting, reproduction on microfilms or in any other way, and storage in data banks. Duplication of this publication of parts thereof is permitted only under the provision of the copyright law 1965, in its current version, and permission of use must always be obtained from MSJ- Mukt Shabd Journal Sciences Violations are liable to prosecution under the copyright law.

**© MSJ 2020**

Typesetting: Camera-ready by author, data conversation by MSJ - Mukt Shabd Journal

# भारताच्याअनुक्रमणिका

## मराठी विभाग


| | | |
|---|---|---|
| 1) | महिला सबलीकरणात गांधीजींचे योगदान -*डॉ. अल्का बाबाराव सोमवंशी* | 1 |
| 2) | महात्मा गांधी व पंचायतराज -*प्रा. संजय अंकुशराव जगताप* | 5 |
| 3) | ग्रामविकासाबाबत म. गांधीजीचे विचार -*प्रा. बी. पी. पवार* | 7 |
| 4) | महात्मा गांधीजींचे आर्थिक विचार -*प्रा. बळीराम पवार* | 10 |
| 5) | सामाजिक अध:पतन रोखण्यासाठी सद्यस्थितीत गांधी विचाराची समर्पकता -*डॉ. बाजीराव मा. पाटील* | 12 |
| 6) | महात्मा गांधी - धर्मविषयक दृष्टिकोन - *अलका पदमाकरराव चिखुर्डेकर* | 15 |
| 7) | म. गांधी प्रणित व्यक्ति स्वातंत्र्य संकल्पना व प्रस्तुतता- *प्रा.डॉ.दत्ता मा. कुंचेलवाड* | 17 |
| 8) | महात्मा गांधी यांचा भारतीय प्रशासन व राजकारणावर असणारा प्रभाव - *प्रा.आर.एस.धप्पाधुळे* | 22 |
| 9) | एकविसाव्या शतकात महात्मा गांधीजींच्या सत्य व अहिंसा विचारांची प्रासंगिकता -*डॉ.डी. डी. क्षीरसागर* | 25 |
| 10) | महात्मा गांधी यांचे सत्याग्रह विषयक विचार -*प्रा. डॉ. पावडे के. डब्ल्यु.* | 29 |
| 11) | महात्मा गांधी यांच्या विचारांची प्रासंगिकता -*डॉ.डोंगरे एल.बी.* | 31 |
| 12) | राष्ट्रपिता महात्मा गांधीजींचे शिक्षण विषयक विचार -*डॉ. संजय शेणमारे, ग्रंथपाल* | 34 |
| 13) | गांधी विचारांची वर्तमान प्रस्तुतता/प्रासंगिकता (ग्रामीण भारताच्या संदर्भात) -*प्रा.डॉ. कविता सोनकांबळे* | 36 |
| 14) | महात्मा गांधींचे शिक्षण कार्यातील योगदान -*प्रा.डॉ.पराग दि.साले.* | 39 |
| 15) | म.गांधी यांच्या सामाजिक विचाराची प्रस्तुतता : एक समाजशास्त्रीय अध्ययन -*प्रा.डॉ.पी.के.पवार* | 42 |
| 16) | महात्मा गांधी : स्वच्छतेचे पुजारी -*डॉ. माणिक पंडीतराव शिंदे* | 44 |
| 17) | गांधी विचारांची प्रासंगिकता - *प्रा.डॉ.जितेंद्र पांडुरंगराव काळे* | 46 |
| 18) | महात्मा गांधीच्या ग्रामोध्दार संकल्पनेत खादीचे महत्त्व - *प्रा. कोमल नारायण काळबांडे* | 48 |
| 19) | गांधीवाद आणि जागतिकीकरण - *प्रा.दत्ता नामदेव कोटरंगे* | 50 |
| 20) | महात्मा गांधीजीचे शिक्षणविषयक विचार - *प्रा. पाटील एस. एन.* | 53 |
| 21) | गांधींची ग्रामस्वराज्य संकल्पना - *प्रा. मेघा शरचंद्र पाठक* | 56 |
| 22) | विश्वशांतीधूत म. गांधीजी आणि राजकारण - *प्रा. डॉ. दत्ताजी हुलप्पा मेहत्रे* | 58 |
| 23) | ग्रामीण विकासातील महात्मा गांधीजींचे योगदान : एक अभ्यास - *प्रा.डॉ. बी.एम.नरवाडे* | 61 |
| 24) | महात्मा गांधीजींचे विचार आणि भारत सरकार द्वारे केलेला ग्राम स्वराज्य अभियानाचा आढावा. (14 एप्रिल 2018 ते 5 मे 2018) - *प्रो.पल्लवी प्रभाकरराव जोशी* | 64 |
| 25) | महात्मा गांधीजींच्या विचारांची वर्तमान काळातील उपयुक्तता - *डॉ.पंजाब चव्हाण* | 66 |
| 26) | महात्मा गांधीजींच्या विचारांची प्रासंगिकता - *डॉ. वैशाली शांताराम बागुल* | 69 |
| 27) | महात्मा गांधीजीचे अहिंसा तत्त्व - *प्रा. सय्यद आर. आर.* | 72 |
| 28) | म.गांधींची सत्याग्रह संकल्पना - एक दृष्टीक्षेप -*प्रा.डॉ.राजेंद्र ज्ञानोबाराव शिंदे* | 74 |
| 29) | महात्मा गांधीजी व शेतकरी चळवळ - *प्रा.नारायण राजुरवार* | 78 |
| 30) | नागरी समाज व गांधी - *प्रा.साबदे राम पांडुरंग* | 83 |

31) 150 वर्षात महात्मा गांधीच्या विचाराची प्रस्तुतता - *डॉ. संगमेश्वर निला* 85

32) महात्मा गांधी विचारांची उपयोगिता आणि धर्मासंबंधी विचार - *संजय सदाशिव जाधव* 88

33) महात्मा गांधी व पंचायतराज -*प्रा. संजय अंकुशराव जगताप* 91

34) गांधीवादी विचार आणि मिरला कथासंग्रह - *प्रा.डॉ.संजय शांताराम पाटील* 93

35) महात्मा गांधींची सत्याग्रह संकल्पना - *डॉ. संजय दगडू क्षीरसागर* 98

36) राष्ट्रपिता महात्मा गांधीचे जीवनविषयक तत्वज्ञान - *डॉ. सत्यभामा जाधव* 102

37) गांधीजीच्या दृष्टीने स्त्रीयांची सामाजिक स्थिती - *सीमा बाबुराव उप्पलवार* 104

38) वैश्विक शांततेसाठी गांधी विचार -*प्रा.डॉ.ए.टी.शिंदे, अंबिका गोविंदराव चोंडे* 106

39) गांधीजींची नयी तालीम : ग्रामोद्योगांद्वारे दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचा एक अभ्यास -*प्रा.डॉ. शिवाजी परळे* 108

40) महात्मा गांधीजीच्या विचारांची प्रासंगिकता - *प्रा. डॉ. श्रीकांत गायकवाड* 112

41) हिन्दस्वराज्य : सामाजिक मुल्ये -*प्रा. तेलंगे एन. एन.* 116

42) महात्मा गांधी यांचे ग्रामीण विकासासंबंधीचे विचार - *प्रा. डॉ. चंद्रशेखर ठाकरे* 118

43) महात्मा गांधी यांची ग्रंथसंपदा मराठी: वाचकांसाठी अनमोल ठेवा - *तुकाराम सिताराम गरड* 121

44) महात्मा गांधींची सत्याग्रह संकल्पनेची उपयोगिता - *डॉ. तांदळे सच्चिदानंद काशिनाथ* 127

45) महात्मा गांधी आणि ग्रामीण विकास - *प्रा.डॉ.मानवते उत्तम हुसनाजी* 129

46) महात्मा गांधीजी यांचे राजकीय कार्य आणि त्यांचा सद्यकालीन राजकारणावर असणारा प्रभाव - *प्रा.डॉ.आचार्य व्ही.डी.* 131

47) महात्मा गांधीजीचे नागरी समाज विषयक विचार - *डॉ. वितेश भारत निकते* 134

48) महात्मा गांधीजींची लोकशाही - *प्रा. डॉ. विठ्ठल पंडितराव सांडूर* 136

49) गांधीवादातील अहिंसा : एक विवेचन - *डॉ.बी.आर.भोसले* 138

50) १५० वर्षानंतरचे महात्मा गांधी - एक अभ्यास - *डॉ. दीपक द. कोदुरवार* 140

51) 'मिठाचा सत्याग्रह' सविनय कायदेभंगाची प्रेरक शक्ती - *डॉ. शिंदे आर. डी.* 142

52) महात्मा गांधी प्रणित ग्रामीण विकास - *डॉ.नामानंद गौतम साठे* 145

53) वर्तमानकाळातही महात्मा गांधीजींचे सत्याग्रह : एक प्रभावी शस्त्र - *प्रा.पी.व्ही.माने* 148

54) महात्मा गांधी यांचे सत्यागृहाबाबतचे विचार - *डॉ. सुभाष के. पवार* 151

55) महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाची जडण-घडण - *विरभद्र गुरप्पा स्वामी* 154

56) गांधी विचारांची सदयकालीन उपयुक्तता - *डॉ.विश्वनाथ महादेव आवड* 157

57) महात्मा गांधीचे शाश्वत विचार - *डॉ. माधव कदम* 160

58) "महात्मा गांधीच्या विचारांची प्रासंगिकता" - *प्रा.स्वामी प्रविण वसंतराव* 162

59) गांधीजींचे स्त्री सक्षमीकरणात योगदान - *डॉ. हट्टेकर विजय दत्तात्रय* 164

60) महात्मा गांधी विचार समज गैरसमज - *प्रा. सकरगे एन. व्ही.* 169

61) 150 वर्षानंतर आर्थिक विकासात गांधी विचाराची गरज. - *श्री. होगे आर. ए.* 172

62) शासन व्यवस्थेत सत्याग्रहाची भूमिका - *प्रा.डॉ.कुंभारकर के.जी.* 176

63) महात्मा गांधीजीचा राष्ट्रवाद आणि आंतरराष्ट्रवाद -डॉ. राजेश सुभाष चालीकवार 178
64) डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा गांधी : संघर्ष आणि समन्वय एक पर्व -प्रा. रामचंद्र गायकवाड 182
65) महात्मा गांधीच्या ग्रामस्वराज्य विषयक विचारांची प्रासंगिकता - डॉ. आशिष मुठे 190
66) महात्मा गांधीजींच्या दृष्टिकोनातून गोरक्षण आणि संवर्धन - दत्तात्रय भानुदास जाधव 192
67) म. गांधी यांचा सत्य आणि अहिंसेचा दृष्टीकोण - डॉ. चंद्रकांत कांबळे 199
68) महात्मा गांधी यांचे शैक्षणिक विचार आणि वर्तमान स्थिती - डॉ. आर. डी. मांडणीकर 204
69) गांधीवादि दृष्टीकोनातून अराज्यवाद - डॉ. पी.डी. सूर्यवंशी 208
70) महात्मा गांधीजी आणि महाराष्ट्र - डॉ. रमेश वाघमोरे 212
71) महात्मा गांधीजींच्या स्वराज्य लढयातील साधनः सत्याग्र - डॉ. भारत एम. राठोड 215
72) गांधीवादी विचाराच्या दृष्टीकोनाची प्रासंगिकता - डॉ. मारोती घंटेवाड 220
73) गांधीजी चे विचार आणि आजची वास्तविकता - डॉ. सविता शिवनाथ झुंजारे 225
74) महात्मा गांधीजींचा अर्थविचार - प्रा. अशोक बाबुराव जाधव 230
75) राष्ट्रीय आंदोलन व्यापक करणारे नेतृत्व : मा. गांधी -डॉ. श्रीकांत देशमुख 234
76) म. गांधीजीच्या स्वप्नातील भारतः चिंता आणि चिंतन -डॉ. युवराज श्रीराम मानकर 236
77) एकविसाव्या शतकात महात्मा गांधी यांच्या विचारांची प्रासंगिकता -डॉ. जी. डी. घोडे 242
78) महात्मा गांधी आणि विविध सामाजिक चळवळी - डॉ.शिवाजी सोमला पवार 249
79) म. गांधी यांचे अहिंसा संबंधी विचार - प्रा.डॉ.संजय काळे, अक्षय काळे 256
80) महात्मा गांधीची ग्राम स्वराज्य संकल्पन- प्रा.डॉ.पाते शिवाजी बाबुराव 259
81) महात्मा गांधीजीच्या विचारशलाकेतील स्वराज्य - प्रा.डॉ.बाबासाहेब त्रिंबक मोताळे 262
82) भारतीय वर्तमान राजकीय परिस्थिती व महात्मा गांधी - डॉ. संतोष शिवकुमार खत्री व संदिप वारुळे 266
83) 21 व्या शतकात जगाला महात्मा गांधी विचारांची प्रासंगिकता -डॉ.पी.एस.मोरे लांडगे 268

■■■■■

# महात्मा गांधी यांचे सत्यागृहाबाबतचे विचार

डॉ. सुभाष के. पवार
सहयोगी प्राध्यापक
स्व. दत्तात्रय पुसदकर महाविद्यालय,
नांदगांव पेठ, ता.जि. अमरावती

## प्रस्तावना :-

महात्मा गांधीजींने मांडलेले तत्वज्ञान हे गांधीवाद या नावाने ओळखले जाते. महात्मा गांधीजींचे स्वतःचे जीवन हा सत्यशोधनासाठी केलेला एक महान प्रयोग आहे. गांधीजी जे बोलले त्याप्रमाणे त्यांनी आचरण केले आहे. त्यांचे तत्वज्ञान हे जीवनात त्यांनी घेतलेल्या प्रत्यक्ष अनुभवावर आधारीत आहे. कोणताही थोर विचारवंत समाजातील अन्याय आणि जुलूम यांनी व्यथित होऊन आपले तत्वज्ञान मांडण्यास प्रवृत्त होतो. समाजातील अनिष्ठ प्रवृत्ती दुर करून चांगला समाज कसा निर्माण करता येईल ? हा त्यांच्या समोरचा प्रश्न असतो. यामुळेच तो आपल्या समोर काही आदर्श कल्पना बाळगतो. महात्मा गांधीजींनीही असे आदर्श स्वतःसमोर ठेवले होते. सत्यागृह आणि अहिंसा ही दोन तत्वे महात्मा गांधीजीच्या विचारांचे मुलाधार आहेत. [1]

## अध्ययन विषयाची उद्दिष्टये :-

1) महात्मा गांधी यांच्या सत्यागृहाबाबतचे विचारांचे अध्ययन करणे.
2) महात्मा गांधी यांच्या सत्यागृहाची मुलतत्वे यांचा अभ्यास करणे.

## सत्यागृह :-

अन्यायाविरूध्द लढण्यासाठी जो अभिनव मार्ग महात्मा गांधी यांनी वापरला आहे. त्यांचे नाव 'सत्यागृह' आहे. सत्याचा सतत शोध आणि सत्य प्राप्त करून घेण्याचा मनात अढळ असा निश्चय ही सत्यागृहांच्या तत्वामागची मुळ प्रेरणा आहे. मानवी संस्कृतीच्या विकासातील महात्मा गांधीजींचे सर्वात महत्वाचे योगदान म्हणजे त्याचे सत्यागृहाचे तत्वज्ञान होय. गांधीवादामध्ये सत्यागृह हे केवळ तत्वज्ञान म्हणून न राहता तो अन्याय आणि जूलुम याविरूध्द लढण्याचा मार्ग बनलेला आह. सत्याचा पुरस्कार करणाऱ्या इतर तत्ववेत्यांहून महात्मा गांधीजींचे वेगळेपण या ठिकाणी आपल्याला दिसून येते. 'अन्याय, जुलुम आणि हिंसा याविरुध्द अहिंसा आणि न्यायमार्गाने दिलेला लढा म्हणजे सत्यागृह होय' सत्यागृहाची कृती ही सत्य प्रेम आणि अहिंसा यावर आधारलेली आहे. त्यात हिंसेला, व्देषाला आणि असत्याला स्थान नाही. [2]

## सत्यागृहाची मुलतत्वे :-

1) सत्यागृहाचा लढा ही आत्मिक बलावर लढावयाच आहे. यात इतर कोणत्याही सामर्थ्यापेक्षा आत्मिक सामर्थ्य महत्वाचे आहे.
2) सत्यागृह हा अन्याय करणाऱ्यांचे हृदय परिवर्तन करण्याचे मार्ग आहे.
3) सत्यागृहामध्ये कोणत्याही प्रकारे हिंसक मार्गाचा वापर करता येत नाही.
4) सत्यागृहमध्ये शारीरिक बळाचा वापर करता येत नाही.
5) व्यक्तिमधील सतप्रवृत्ती सत्यागृहाच्या मार्गाने जागृत करता येते.
6) चांगले साध्य प्राप्त करण्यासाठी साधने सुध्दा चांगली पाहिजेत. जसी साधने असतील तसेच साध्य प्राप्त होईल. म्हणून सत्याची प्राप्ती सुध्दा अहिंसेच्या मार्गाने होवू शकते.

## सत्यागृहाच्या मार्गाचा अवलंब करण्यासाठी पात्रता :-

1) सत्यागृह करणाऱ्यांची परमेश्वरावर अढळ श्रध्दा असावी ही श्रध्दा त्याला विरोधकांचा त्रास सहन करण्याची शक्ती देते.
2) सत्यागृहाला संपत्ती व प्रसिध्दीची हाव नसावी.

ISSN NO : 2347-3150

3) त्यांचे आरोग्य चांगले असावे.
4) तो भित्रा किंवा घाबरणारा नसावा.
5) तो ध्येयनिष्ठ असला पाहिजे.
6) व्देष, क्रोध व घृणा यांच्या आहारी जाणारा नसावा.
7) विरोधकांबद्दल त्यांच्या मनात प्रेम, आदर असला पाहिजे.

सत्यागृहात महात्मा गांधीजींनी शुध्द आचरणावर अधिक भर दिला आहे. हिंसेला त्यात कुठलेच स्थान नाही.

**सत्यागृहाची तंत्रे :-**

महात्मा गांधीर्जीनी सत्यागृहाचा प्रयोग करतांना वापरावयाची निरनिराळी तंत्रे सांगीतली आहे. ती पुढील प्रमाणे :-

**1) असहकार :-**

महात्मा गांधीजीच्या मते, अत्याचारी राज्याला सहकार्य न दिल्यास ती सरळ मार्गावर येवू शकतात. महात्मा गांधीर्जीनी 1920-21 मध्ये असहकाराची चळवळ सुरू केली होती. या असहकार चळवळीला मोठा प्रतिसाद मिळाला होता. अनेक लोकांनी नौकऱ्या सोडल्या होत्या.

शासितांच्या स्वीकृतीशिवाय निरंकुश सरकार देखिल कायम राहु शकत नाही. निरंकुश सत्ताधारी ही स्विकृती शक्तीने मिळवितो, प्रजा निरंकुश सत्तेला भिणे सोडून देईल, तेव्हाच निरंकुश सत्तेची समाप्ती होईल.' [3]

**2) सविनय कायदे भंग :-**

महात्मा गांधीची असे म्हणतात की, राज्यकर्ते जनतेच्या इच्छेकडे दुर्लक्ष करून जर राज्यकारभार करीत असतील, तर जनतेने राज्याचे कायदे पाळू नयेत, कायदेभंग करतांना समाजहिताची हानी होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे.

**3)हरताळ :-**

हरताळ ऐच्छिक असावा, हरताळ हिंसात्मक नसावा. हरताळा मागची भूमिका इतरांना स्पष्टपणे समजली पाहिजे, हरताळकर्त्यांनी केवळ हरताळ तंत्रावर अवलंबून राहु नये. तसेच हरताळाचा मार्ग वारंवार चोखाळू नये, नाही तर त्यांचे महत्व कमी होईल.

**4)उपोषण :-**

उपोषण हे सत्यागृहाचे फार प्रभावी साधन आहे, उपोषण हे अतिशय आवश्यक असतांना वापरावयाची साधन आहे. ज्यांचा आत्मा पूर्ण शुध्द आहे व जे अनुशासनप्रिय आहे. त्याच व्यक्ति उपोषण करू शकतात. उपोषणामागे स्वार्थहेतू नसावा.

**5)बहिष्कार :-**

जनमनाची अवहेलना करणाऱ्यांना सहकार्य न देणे म्हणजे बहिष्कार होय. बहिष्कारामुळे त्या व्यक्तिला आपल्या वाईट वर्तनाची जाणिव होते व ते योग्य मार्गावर येतो. इंग्रज राजवटीत भारतीयांनी परकिय मालावर बहिष्कार टाकला होता.

**6)हिजरत किंवा देशत्याग :-**

जेव्हा एखाद्या ठिकाणी जनतेवर सतत अन्याय होत असेल तर आणि अहिंसात्मक मार्गाने त्याचा प्रतिकार अशक्य झाला असेल तर अशा वेळी जनतेने तो प्रदेश सोडावा उदा. बारडोली, जुनागड येथील सत्यागृहींना हिजरत प्रयोगाचे संमती दिली होती.

**7)धरणे :-**

महात्मा गांधीजींच्या मते, जननिंदेव्दारे समाजातील कलंकित व्यक्तिला लज्जित करणे हा यांचा उद्देश आहे. धरणे धरतांना हिंसात्मक मार्गाचा अवलंब करू नये.

**सत्याग्रहीसाठी आवश्यक गुण :-**

सत्याग्रह माणसाजवळ कोणते गुण असेल पाहिजे किंवा त्याने कोणते गुण अंगीकारले पाहिजे यांची चर्चा महात्मा गांधी यानी केली आहे.

1) संयम आणि निर्भयता हे गुण सत्याग्रहीसाठी आवश्यक आहे.

2) शरीरिक क्लेषांना तोंड देण्याची मनाची तयारी असणे आवश्यक आहे.

3) त्यांच्या मनात सेवाभावी वृत्ती व इतरांविषयी प्रेमभावना असणे आवश्यक आहे.

4) अन्यायाविरूध्द लढण्याची जिद्द त्यांच्यात असली पाहिजे.

5) सत्याग्रहीने दुर्गूणांपासुन अलिप्त राहण्याची काळजी घेतली पाहिजे.

**सत्याग्रहाच्या मार्गाची उपयुक्तता :-**

सत्याग्रह म्हणजे महात्मा गांधीजींनी जगाला दिलेली फार मोठी देणगी आहे. महात्मा गांधीजींच्या सर्व विचारात सत्याग्रहालाच महत्वाचे स्थान आहे. अहिंसात्मक संघर्षाचे ते सर्वात मोठे अस्त्र आहे. सत्याग्रह शब्दाचाच अर्थ 'सत्याचा आग्रह' असा होतो. सत्याचा उपासक आत्मक्लेश सहन करून विरोधकाला चुकीच्या मार्गावरून योग्य मार्गावर आणण्याचा प्रयत्न करतो. महात्मा गांधी यांनी सामाजिक व राजकिय अन्याय दूर करण्यासाठी या मार्गाचा वापर केला आहे. दक्षिण आफ्रिकेत वंशभेदाच्या धोरणविरूध्द लढा देण्यासाठी सत्याग्रह या मार्गाचा वापर महात्मा गांधी यांनी केला आहे. तसेच शेतकऱ्यांचे शोषण थांबविण्याकरिता, भारतातील चंपारण्यात केलेले आंदोलन, खेडा जिल्ह्यात शेतकऱ्यांवरील अन्याय दूर करण्याकरिता, रोलेट कायद्यासारखे जुलुमी कायदा रद्द करण्याकरिता, महात्मा गांधी यांनी सत्याग्रहाचा वापर केला आहे. तसेच असहकार चळवळ, सविनय कायदेभंग, बहिष्कार, उपोषण वैयक्तिक सत्याग्रह अशा विविध पध्दतीने सत्याग्रहाच्या मार्गाचा वापर महात्मा गांधी यांनी केला आहे.[4]

सत्याग्रहाच्या बाबतीत एक प्रश्न उपस्थित केला जातो. स्वातंत्र्य आंदोलनामध्ये सत्याग्रहाच्या मार्गाचा अवलंब करता आला, पण व्यक्ति व्यक्तितील, गटा-गटातील, किंवा राज्या राज्यातील संघर्ष अहिंसेच्या आणि सत्याग्रहाच्या मार्गाने सोडविणे व्यवहारात शक्य आहे का ? महात्मा गांधीजींनी याबाबत असे म्हटले आहे की, 'शास्त्र म्हणून सत्याग्रह अद्याप पूर्ण विकसित झलेली अशी पध्दती नाही आहे. ते निर्मितीच्या अवस्थेतील शास्त्र आहे.' सत्याग्रहाच्या मार्गाची ही मर्यादा लक्षात घेतली पाहिजे.

**संदर्भसूची :-**


1) श्रीकांत देशपांडे, (2009) भारतीय राजकिय विचारवंत, मंगेश प्रकाशन, नागपूर.

2) र. घ. वराडकर, (2011) भारतीय राजकिय विचारवंत, विद्या प्रकाशन, नागपूर.

3) कमलेश कुमारसिंह, (2008) प्रमुख राजनितीक विचारधाराएँ, राधा प्ब्लिकेशन, न्यू दिल्ली.

4) कान्ता मीणा, (2011) गांधी, नेहरू, आंबेडकर आदी पब्लिकेशन्स, जयपूर.

5) नरेंद्र चपळगावकर, (2013) महात्मा गांधी, भारतीय राज्यघटना, राजहंस प्रकाशन, पुणे.

6) राजमोहन गांधी, (2013) मोहनदास, मेहता पब्लिकेशन्स हाऊस, पुणे.

7) ब्रिजमोहन हेडा, (2004) महात्मा गांधी, अखेरचे पर्व, ग्रंथ प्रकाशक, वंवितरक, अकोला.


■■■■■